ePaper
वर्ष - 9 । अंक - 182 | UDYAM-MH-26-0158827
महाईन्यूज (TM)
WWW.MAHAENEWS.COM | शुक्रवार, दि. 27 फेब्रुवारी 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आठवीच्या पुस्तकातील न्यायालय धड्यावर पंतप्रधान मोदींची नाराजी





पान 2 वरुन...

अजितदादांच्या विमान अपघाताची चौकशी

### राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) राष्ट्रीय कार्यकारिणीच्या बैठकीत निर्णय

# सुनेत्रा पवार राष्ट्रवादीच्या सर्वेसर्वा

महाईन्यूज । मुंबई

**राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या संघटनात्मक रचनेत मोठी फेरबदल करण्यात आले असून सुनेत्रा पवार यांच्याकडे आता राष्ट्रीय अध्यक्षपदाची धुरा सोपवण्यात आली आहे. अजित पवार यांचे विमान अपघातात निधन झाल्यानंतर राज्याच्या राजकारणात अनेक बदल झाले आहेत. अजित पवार यांच्या निधनानंतर त्यांच्या पत्नी व महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेसच्या (एनसीपी) अध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली आहे.**



अजितदादांकडे उपमुख्यमंत्री पदासह पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्षपदही होते. अजितदादांच्या निधनानंतर पक्षाच्या नेतृत्वाची जबाबदारी कोणाकडे जाणार, याबाबत चर्चा सुरू होती. त्यामुळे सुनेत्रा पवार यांची या पदावर नियुक्ती होणे निश्चित मानले जात होते.



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीची बैठक आज वरळी डोम येथील सभागृहात पार पडली. यावेळी राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्ष प्रफुल पटेल यांनी सुनेत्रा पवार यांच्या नावाचा प्रस्ताव मांडला. त्याला सर्व सदस्यांनी हात उंचावून पाठिंबा दिला. यानंतर सुनेत्रा पवार यांची राष्ट्रीय अध्यक्षपदी एकमताने निवड झाल्याचे प्रफुल पटेल यांनी जाहीर केले. प्रफुल पटेल यांनी यावेळी अजित पवारांच्या आठवणींना उजाळा दिला. अजित पवार यांच्या नेतृत्वाविषयी बोलताना पटेल म्हणाले, ज्या प्रकारे एखादा सेनापती सैन्याच्या पुढे उभा राहून नेतृत्व करतो, त्याप्रमाणे अजित पवार सर्व निवडणुकांमध्ये कार्यकर्त्यांचे नेतृत्व करत होते. त्यामुळेच २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत अजितदादांच्या नेतृत्वामुळेच राष्ट्रवादी काँग्रेसचे चांगल्या संख्येने आमदार निवडून आले. नवीन नेतृत्वामुळे पक्षाला नवी ऊर्जा मिळेल आणि आगामी निवडणुकांसाठी पक्ष अधिक संघटितपणे मैदानात उतरेल, अशी अपेक्षा कार्यकर्त्यांकडून व्यक्त होत आहे.

> एखादा सेनापती जसा सैन्याच्या पुढे उभा राहून नेतृत्व करतो, त्याप्रमाणे अजित पवार प्रत्येक निवडणुकीत कार्यकर्त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहिले. त्यांच्या नेतृत्वामुळेच २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसला उल्लेखनीय यश मिळाले.
>
> - प्रफुल पटेल, खासदार, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट).

## सुनेत्रा पवार राष्ट्रीय अध्यक्षपदी बिनविरोध

पक्षाचे तत्कालीन राष्ट्रीय अध्यक्ष आणि महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या दुर्दैवी विमान अपघातात निधनानंतर राज्याच्या राजकारणात मोठे बदल झाले. अजित पवारांकडे उपमुख्यमंत्री पदासह पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्षपदही होते. त्यांच्या निधनानंतर पक्षाच्या नेतृत्वाची जबाबदारी कोणाकडे जाणार, याबाबत चर्चा सुरू होती. अखेर सुनेत्रा पवार यांची अध्यक्षपदी नियुक्ती निश्चित मानली जात होती आणि त्यावर शिक्कामोर्तब झाले. सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखाली पक्षाची संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करण्यावर भर दिला जाणार असल्याची चर्चा आहे. राज्यातील बदलत्या राजकीय समीकरणांच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे.

## पार्थ पवार राज्यसभेत जाणार



अजित पवार यांच्या निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची जबाबदारी सुनेत्रा पवार यांच्याकडे सोपवण्यात आली असून आज सुनेत्रा पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार) राष्ट्रीय अध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला आहे. दरम्यान, यावेळी प्रफुल पटेल यांनी आणखी एक मोठी घोषणा केली आहे. पार्थ पवार यांना पक्षाने राज्यसभेसाठी उमेदवारी जाहीर केली असल्याची माहिती प्रफुल पटेल यांनी दिली आहे. प्रफुल पटेल यांनी राज्यसभेसाठी पार्थ पवार यांच्या नावाची घोषणा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या बैठकी दरम्यान केली आहे. त्यामुळे आता पार्थ पवार राज्यसभेची निवडणूक लढवणार असल्याचं स्पष्ट झालं आहे. “राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कमिटीने एकमताने निर्णय घेतला आहे. मात्र, हा निर्णय आम्ही आमच्या पक्षाच्या अध्यक्षांच्या उपस्थित घेऊ इच्छित नव्हतो, त्यामुळे आज या ठिकाणी स्पष्ट करतो की, आता राज्यसभेची जी निवडणूक जाहीर झालेली आहे. त्यासाठी ५ तारखेपर्यंत उमेदवारी अर्ज भरायचा आहे. त्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने निर्णय घेतला आहे की पार्थ अजित पवार हे आमच्या पक्षाचे उमेदवार असतील”, असे पटेल म्हणाले.

# अजितदादांच्या विमान अपघाताची चौकशी

## घातपात आढळल्यास गुन्हा दाखल करणार; सीआयडी

**महाईन्यूज । पुणे**

**अजित पवारांच्या विमान अपघाताची चौकशी करण्याची मागणी सर्व स्तरांतून होत आहे. आमदार रोहित पवार यांनीही यासंदर्भात मागणी केली आहे. त्यांनी व्हीएसआर विमान कंपनीवर गुन्हा दाखल करण्यासाठी आक्रमक पवित्रा घेतला आहे. दरम्यान, आज अजित पवारांच्या विमान अपघाताच्या तपासप्रकरणी पुण्यात सीआयडीने पत्रकार परिषद घेतली.**




यावेळी सीआयडी अधिकाऱ्यांनी हा विमान अपघाताचा तपास का महत्त्वाचा आहे, हे स्पष्ट केले. तसेच त्यांनी सांगितले की, अजित पवार यांच्या विमान अपघाताचा तपास योग्य दिशेने सुरू आहे; तपासात घातपात आढळल्यास गुन्हा दाखल करण्यात येईल. यासंदर्भात पुणे आणि मुंबई येथील पोलीस अधिकारी तपास करत आहेत.

या मृत्यूमागे घातपात आहे का, हा तपासाचा मुख्य उद्देश आहे. त्यानंतर गुन्हेगारी निष्काळजीपणा आहे का, हा तपासाचा भाग आहे. तिसरा मुद्दा म्हणजे या प्रकरणात कोणते गुन्हेगारी कृत्य घडले आहे का, हेही तपासले जात आहे. वरील सर्व बाबींच्या अनुषंगाने या प्रकरणाचा तपास सुरू आहे." या तपासामध्ये घातपात, गुन्हेगारी निष्काळजीपणा किंवा अन्य गुन्हेगारी कृत्य निष्पन्न झाल्यास योग्य त्या कलमांखाली सीआयडी गुन्हा दाखल करून पुढील तपास पूर्ण करेल आणि न्यायालयात अभियोग चालवेल," असे सीआयडी अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

### AAIB आणि CBI संदर्भात भूमिका

एएआयबी (AAIB) यांच्याशी सीआयडीचा सातत्याने संपर्क असून त्यांचाही तपास सुरू आहे. त्यांचा तपास पूर्ण झाल्यानंतर त्याचा अहवाल आकस्मिक मृत्यूच्या तपासात महत्त्वाचा ठरेल. सदर घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनानेही हा तपास सीबीआयकडे वर्ग करण्यासाठी पत्रव्यवहार केला आहे.

### नेमकं काय म्हणाले सीआयडी अधिकारी?

"बारामती येथील विमान दुर्घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन विमानातील अजित पवार व अन्य व्यक्तींच्या आकस्मिक मृत्यूचा तपास पोलिस स्टेशन बारामती येथे कलम १९४ बीएनएसएस अंतर्गत नोंद करण्यात आला होता. त्यानंतर हा तपास पोलिस महासंचालकांनी सीआयडीकडे वर्ग केला आहे. सध्या हा तपास सीआयडी करत आहे. सदर तपास पोलीस अधीक्षक, गुन्हे अन्वेषण विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

## भीमाशंकर मंदिराच्या सभामंडपाची गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये होणार नोंद

**महाईन्यूज । पुणे**

**पुढील वर्षी होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर भीमाशंकर येथील मंदिराचा जीर्णोद्धार करण्यात येत असून, सुमारे पावणे तीन हजार चौरस फुटांच्या सभा मंडपाचे काम केवळ चार महिन्यांत पारंपरिक तंत्रज्ञानाचा वापर करून पूर्ण करण्यात येणार आहे. देशात पहिल्यांदाच अशा स्वरूपाचे जीर्णोद्धाराचे काम पुरातत्त्व विभागामार्फत करण्यात येत असून, दगडातील हे बांधकाम गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये समाविष्ट करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने पुढाकार घेतला आहे. त्यासाठी लवकरच सल्लागाराची नेमणूक करण्यात येणार असून, गिनीज वर्ल्ड रेकॉर्डचे पदाधिकारीही याला अनुकूल असल्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी सांगितले.**



> भीमाशंकर मंदिराच्या कामाचा गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये समावेश होणे केवळ पुण्याच्याच नव्हे, तर राज्याच्या व देशाच्या दृष्टीने अभिमानास्पद आहे. ही नोंद निश्चित होईल याची खात्री आहे.
> - जितेंद्र डुडी, जिल्हाधिकारी,पुणे.

पुढील वर्षी नाशिक येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर जुन्नर तालुक्यातील भीमाशंकर ज्योतिर्लिंगाच्या तीर्थक्षेत्र विकास आराखड्यास राज्य सरकारने यापूर्वीच मान्यता दिली आहे. यासाठी २८८ कोटी १७ लाख रुपयांची मदत राज्य सरकारकडून केली जाणार आहे. तर केवळ सभामंडपासाठी १० कोटी रुपयांचा खर्च करण्यात येत आहे.

या ऐतिहासिक सभामंडपाची पुनर्बांधणी हा सांस्कृतिक, स्थापत्य आणि आध्यात्मिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा प्रकल्प आहे. कमी वेळेत पारंपरिक साहित्य व तंत्रांचा वापर करून, उत्कृष्ट कारागिरीच्या साहाय्याने पूर्ण झालेला हा प्रकल्प राष्ट्रीय स्तरावर आदर्श ठरणार असून, याची जागतिक पातळीवर नोंद व्हावी, यासाठी गिनीज वर्ल्ड रेकॉर्डसाठी अर्ज करण्यात येणार आहे. या मंदिराच्या सभा मंडपाचे काम पुरातत्त्व विभागाकडे देण्यात आले आहे.

हा सभामंडप दगडांच्या साहाय्याने पारंपरिक तंत्रज्ञानातून बनविला जात आहे. या सभामंडपात एकूण ४८ स्तंभ असून, मध्यभागी घुमट तयार करण्यात येणार आहे. या सभामंडपाचे एकूण क्षेत्र २ हजार ७५० चौरस फूट इतके असेल. यातील स्तंभ दोन ते तीन दगडांमध्ये पूर्ण करण्यात येणार असून, स्तंभांवर कमानी उभारल्या जाणार आहेत.

या कमानीदेखील तीन दगडांमध्येच पूर्ण करण्यात येणार आहेत. त्यावर असलेला घुमट हादेखील तशाच पद्धतीने उभारला जाणार आहे. हा सभा मंडप तयार करण्यासाठी केवळ चार महिन्यांचा कालावधी लागणार असून, हे काम विक्रमी वेळेत पूर्ण करण्याची ही पहिलीच वेळ असणार आहे.

वारसा जतन करणे ही जागतिक पातळीवरील चळवळ आहे.

अशा प्रकारचे प्रकल्प अनेक देशांत राबविले गेले आहेत. त्यात कंबोडियातील प्राचीन मंदिरांचे संवर्धन, श्रीलंकेतील ऐतिहासिक स्थळांचे जतन, जपानमधील पारंपरिक लाकडी वास्तू पुनर्बांधणी, रोमन व ग्रीक पुरातत्त्वीय स्थळांचे संवर्धन, इटलीतील ऐतिहासिक इमारतींचे पुनरुज्जीवन करण्यात आले आहे. भीमाशंकर प्रकल्प या जागतिक परंपरेशी सुसंगत आहे.

या सभामंडपाचे काम ९ जानेवारी रोजी सुरू करण्यात आले असून, ३० एप्रिलपर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. त्यामुळे केवळ चार महिन्यांच्या काळात हे काम पूर्ण होणार आहे. यासंदर्भात लंडन येथील गिनीज वर्ल्ड रेकॉर्डच्या अधिकाऱ्यांशी प्राथमिक चर्चा करण्यात आली आहे. त्यानुसार एका सल्लागाराची नेमणूक करण्यात येणार असून, त्यांच्या देखरेखीखाली काम पूर्ण करण्यात येणार आहे.

# अखेर दीडशेहून अधिक कुटुंबांचा 'वनवास' संपला!

## DPDC योजनेतून नवीन ट्रान्सफॉर्मर बसविल्याने दिलासा

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**चऱ्होली परिसरातील सेव्हन हिल्स रेसिडेन्सी खंडोबामाळ येथील रहिवाशांना गेल्या काही वर्षांपासून भेडसावणाऱ्या कमी व्होल्टेज व सतत होणाऱ्या विद्युत फ्लक्चुएशनच्या गंभीर समस्येतून अखेर दिलासा मिळाला आहे. माजी महापौर व विद्यमान नगरसेवक नितीन काळजे, नगरसेवक सचिन तापकीर यांच्या पाठपुराव्याने आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकारातून DPDC योजनेअंतर्गत दिनांक २१ फेब्रुवारी २०२६ रोजी या परिसरात नवीन ट्रान्सफॉर्मर बसविण्यात आला असून, त्यामुळे दिडशेहून अधिक कुटुंबांचा दैनंदिन जीवनातील मोठा प्रश्न कायमस्वरूपी सुटला आहे.**



ही समस्या रहिवाशांनी स्थानिक लोकप्रतिनिधींच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर तात्काळ हालचालींना वेग आला. माजी महापौर नितिन काळजे आणि नगरसेवक सचिन तापकीर यांनी ही बाब गांभीर्याने घेत आमदार महेश लांडगे यांच्याकडे याबाबत माहिती दिली. आमदार लांडगे यांनी या प्रश्नाची तात्काळ दखल घेत DPDC योजनेतून नवीन ट्रान्सफॉर्मर मंजूर करून प्रत्यक्ष बसवून दिला. ट्रान्सफॉर्मर कार्यान्वित झाल्यानंतर परिसरात आता स्थिर व योग्य व्होल्टेज मिळत असून सर्व घरगुती उपकरणे सुरळीतपणे चालू लागली आहेत. पाणीपुरवठा, घरकाम व इतर दैनंदिन व्यवहार कोणत्याही अडथळ्यांशिवाय होत असल्याने रहिवाशांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. “वीज आणि पाण्यासाठीचा आमचा एक वर्षांचा वनवास जणू काही कायमचा संपला आहे,” अशी भावना येथील रहिवाशांच्या मनात असून सर्वांच्या चेहऱ्यावर आनंद व दिलासा स्पष्टपणे दिसून येत आहे. या संपूर्ण प्रक्रियेत आमदार महेश लांडगे यांचे कार्यालयीन प्रतिनिधी पुनित गळीतकर यांनी विशेष सहकार्य, योग्य मार्गदर्शन व सातत्यपूर्ण पाठपुरावा करून हा प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावण्यात मोलाची भूमिका बजावली.

### काय होती समस्या..?

चऱ्होलीतील सेव्हन हिल्स रेसिडेन्सीमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून रहिवासी वास्तव्यास आहेत. मात्र मागील एक वर्ष अत्यंत कमी व्होल्टेजमुळे नागरिकांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत होता. घरातील फ्रीज, पंखे, पाणी उपसण्याच्या मोटर्स तसेच इतर विद्युत उपकरणेही व्यवस्थित कार्यरत राहत नव्हती. विशेषतः पाणीपुरवठ्यासाठी बोअरवेल सुरू करण्यासाठी अनेकदा रहिवाशांना रात्री उशिरापर्यंत जागरण करावे लागत होते. 'वर्क फॉर्म होम' करणाऱ्या युवकांना देखील या परिस्थितीचा मोठा त्रास होत होता. अनेकांच्या नोकऱ्या धोक्यात आल्या होत्या.. याचा थेट परिणाम दैनंदिन कामकाजावर व जीवनमानावर होत होता.

> “ वीज, पाणी व इतर मूलभूत सुविधा सुरळीत मिळणे हा प्रत्येक नागरिकाचा हक्क आहे. त्या दृष्टीने कोणत्याही भागातील नागरिक अडचणीत असतील तर त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहणे हे आमचे कर्तव्य आहे. मा. महापौर, नगरसेवक नितिन काळजे, नगरसेवक सचिन तापकीर आणि सहकाऱ्यांच्या समन्वयामुळे हा प्रश्न मार्गी लागला. नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी सदैव तत्पर आहोत.
>
> \- महेश लांडगे, आमदार, भाजपा पिंपरी चिंचवड.

### रहिवाशांनी मानले आभार

सेव्हन हिल्स रेसिडेन्सी येथील सर्व रहिवाशांनी आमदार महेश लांडगे, मा. महापौर नितिन काळजे, नगरसेवक सचिन तापकीर आणि पुनित गळीतकर यांचे मनःपूर्वक आभार मानले असून, लोकप्रतिनिधींच्या तत्परतेमुळे नागरिकांचे प्रश्न कसे मार्गी लागू शकतात याचे हे उत्तम उदाहरण असल्याची भावना व्यक्त केली आहे.

# पवनाथडी जत्रेचे आमदार शंकर जगताप यांच्या हस्ते उद्घाटन

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी चिंचवड शहरातील महिला बचत गटांनी तयार केलेल्या वस्तू व खाद्यपदार्थांच्या विक्रीसाठी पवनाथडी जत्रा हे एक मोठे व्यासपीठ ठरले आहे. जत्रेत सहभागी असलेल्या स्टॉलधारक महिलांनी आपला व्यवहार डिजिटल पद्धतीने करावा, ज्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेला हातभार लागेल. पवनाथडी जत्रेच्या माध्यमातून महिलांचे आर्थिक सक्षमीकरण करण्यासोबतच त्यांचे मनोधैर्य वाढविण्यावर पिंपरी चिंचवड महानगरपालिका भर देत आहे.**



पिंपरी चिंचवड शहरात भविष्यात महिलांसाठी मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती कशी करता येईल, यासाठी महापालिका निश्चितच पुढाकार घेईल, असे प्रतिपादन आमदार शंकर जगताप यांनी केले. महिला बचत गटांच्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने दिनांक २६ फेब्रुवारी ते १ मार्च २०२६ या कालावधीत पवनाथडी जत्रेचे आयोजन करण्यात आले आहे. या जत्रेचे उद्घाटन चिंचवड विधानसभेचे आमदार शंकर जगताप यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. या उद्घाटनप्रसंगी उपमहापौर शर्मिला बाबर, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, नगरसदस्य शत्रुघ्न काटे, अभिषेक बारणे, मनिषा पवार, अर्चना तापकीर, महापौर यांच्या पत्नी श्रध्दा लांडगे, तसेच अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे, समाज विकास विभागाच्या उपायुक्त ममता शिंदे, उप आयुक्त सिताराम बहुरे, संदीप खोत, अर्चना केरूरे, महापालिकेचे क्षेत्रीय अधिकारी, विविध विभागातील कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपायुक्त ममता शिंदे यांनी तर सूत्रसंचालन जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी केले. उपस्थितांचे आभार महिला व बालकल्याण समितीच्या राणी पठारे यांनी मानले. यानंतर सादर करण्यात आलेल्या ‘महाराष्ट्राचा मराठी बाणा’ या सांस्कृतिक कार्यक्रमालाही नागरिकांनी मोठी उपस्थिती लावली. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या समाज विकास विभागाच्या वतीने महिलांच्या सक्षमीकरणासाठी पवनाथडी जत्रेचे आयोजन सांगवी येथील पीडब्ल्यूडी मैदान येथे करण्यात येते. महाराष्ट्राच्या खाद्यसंस्कृतीची चव पारंपरिक पदार्थही येथे उपलब्ध आहेत. नागरिकांच्या मनोरंजनासाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या जत्रेमध्ये महिलांनी तयार केलेली उत्पादने व विविध खाद्यपदार्थ विक्रीसाठी उपलब्ध असून, सांस्कृतिक कार्यक्रमांचीही मेजवानी नागरिकांना अनुभवता येणार आहे.

# मायबोलीत बोलू या! चला... मराठीतच बोलू या!!



## भूमिका

**२७ फेब्रुवारी हा दिवस प्रत्येक मराठी माणसासाठी अभिमानाचा असतो. वि. वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांच्या जन्मदिनी साजरा होणारा मराठी भाषा गौरव दिन केवळ एका भाषेचा उत्सव नाही, तर आपल्या संस्कृतीचा, अस्मितेचा आणि परंपरेचा सन्मान आहे. मराठी ही केवळ संवादाचे माध्यम नसून जीवनपद्धती, इतिहास आणि सृजनशीलतेचे जिवंत प्रतीक आहे.**

या दिवशी मराठीच्या गौरवाबरोबरच तिच्या संवर्धनाचा संकल्प करण्याची गरज अधिक प्रकर्षाने जाणवते.मराठी भाषेचे वैशिष्ट्य म्हणजे तिचे वैविध्य. वऱ्हाडी, कोकणी, मालवणी, अहिराणी, झाडीबोली, खानदेशी, कोल्हापुरी अशा अनेक उपभाषांनी मराठी अधिक समृद्ध केली आहे. या बोलीभाषांमध्ये स्थानिक संस्कृती, लोकजीवन आणि भावविश्वाचे प्रतिबिंब दिसते. जशा अनेक उपनद्या मिळून नदी विशाल बनते, तशाच उपभाषांनी मराठीला गोडवा, विस्तार आणि ऊर्जा दिली आहे. संत परंपरेपासून लोककाव्यापर्यंत अनेक साहित्यप्रकारांनी या बोलींच्या माध्यमातून मराठीची ताकद वाढवली आहे.

भाषा ही स्थिर नसते; ती काळानुसार बदलते, स्वीकारते आणि विकसित होते. म्हणूनच मराठीने इतर भाषांतील शब्द आत्मसात करत आपले अस्तित्व अधिक व्यापक केले आहे. कोकणात कन्नडचा प्रभाव, वऱ्हाडात हिंदीचा, तर अहिराणीमध्ये गुजरातीची छटा दिसते. हा प्रभाव मराठीची कमजोरी नसून तिची सामावून घेण्याची क्षमता दर्शवतो. विविधतेतून समृद्ध होणे हीच तिची खरी ओळख आहे.




आजच्या जागतिकीकरणाच्या युगात मात्र मराठीसमोर काही आव्हाने उभी आहेत. इंग्रजीच्या वाढत्या प्रभावामुळे दैनंदिन व्यवहारात मराठीचा वापर कमी होताना दिसतो. शहरी भागात मराठी शाळांची संख्या घटते आहे, तर डिजिटल माध्यमांवर मराठीचे प्रमाण तुलनेने कमी आहे. ही परिस्थिती बदलण्यासाठी केवळ शासनाच्या धोरणांवर अवलंबून राहून चालणार नाही; समाजाच्या सक्रिय सहभागाची गरज आहे.



मराठीचे संवर्धन व्यवहारातूनच शक्य आहे. घरात, शाळेत, कार्यालयात आणि सामाजिक माध्यमांवर मराठीचा जाणीवपूर्वक वापर वाढवणे आवश्यक आहे.मराठी माध्यमातील शिक्षणाला प्रोत्साहन देणे, मराठी शाळांचे अस्तित्व टिकवणे आणि नव्या पिढीला बोलीभाषांचा अभिमान वाटेल असे वातावरण निर्माण करणे ही काळाची गरज आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून मराठीत लेखन, वाचन आणि संवाद वाढवला तर भाषेला नवे आयाम मिळू शकतात.

मराठी भाषा गौरव दिन हा केवळ उत्सव नसून आत्मपरीक्षणाची संधी आहे. मराठीचा सन्मान केवळ घोषणांतून नव्हे, तर कृतीतून दिसला पाहिजे. 'तुम्हाला मराठी येते म्हणजे तुम्ही मराठी आहात' हा उदात्त विचार जपणे आवश्यक आहे. उपभाषांच्या रंगांनी नटलेली माय मराठी आपली सामूहिक ओळख आहे.

चला, या गौरवदिनी एक ठाम संकल्प करूया मराठीचा अभिमान बाळगू, तिचा वापर वाढवू आणि पुढील पिढ्यांसाठी ही समृद्ध परंपरा जतन करू. मराठी माणसाने मराठी माणसाशी मराठीतच बोलावे, हीच खरी भाषेला वाहिलेली आदरांजली ठरेल.

## प्रासंगिक »

### अविचार

***एका शिकाऱ्याने रानात एक कोल्हा पाहिला. तो इतका सुंदर दिसत होता की, त्याचे कातडे आपल्याजवळ असावे अशी त्या शिकाऱ्याला इच्छा झाली. त्याने त्या कोल्ह्याचे बीळ शोधून काढले व त्या बिळाच्या तोंडापुढे एक खड्डा खणला.***

नंतर त्या खड्ड्यात काही वाळलेली झुडपे घातली व त्यावर मोठा मांसाचा तुकडा ठेवला. कोल्हा तो मांसाचा तुकडा पाहून तेथे येईल व खड्ड्यात पडेल असे त्याला वाटले. सर्व तयारीनंतर तो शिकारी एका झाडापाठीमागे लपून बसला. थोड्या वेळाने कोल्हा बाहेर आला व समोरच असलेला मांसाचा तुकडा पाहून तो खावा असे त्याला वाटले; पण त्यात काहीतरी कट असावा असे वाटून तो पुन्हा आपल्या बिळात जाऊन बसला. इतक्यात एक वाघ तेथे आला. काही विचार न करता त्याने त्या मांसाच्या तुकड्यावर झडप घातली व तो खड्ड्यात पडला. त्याच्या पडण्याचा आवाज त्या शिकाऱ्याने ऐकला व तो धावत तेथे गेला. खड्ड्यात कोल्हा पडला असे समजून त्याने खड्ड्यात उडी मारली, तेव्हा वाघाने त्याला फाडून खाल्ले.

तात्पर्य : अविचाराने नेहमी अनर्थ घडत असतात.

राज्यातील विविध भागांना अवकाळी पावसाने दिलेला तडाखा शेतकऱ्यांसाठी नव्या संकटाचे द्योतक ठरला आहे. विदर्भ, मराठवाडा, कोकण आणि मध्य महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये रब्बी हंगामाच्या उंबरठ्यावर उभ्या पिकांचे मोठे नुकसान झाले. गहू, हरभरा, ज्वारी, मका यांसारख्या पिकांसह आंबा, काजू, द्राक्षांसारख्या नगदी पिकांनाही मोठा फटका बसला.

# अवकाळीचे संकट!

हाता तोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून घेतल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक गणित पुन्हा कोलमडले आहे. रब्बी हंगाम शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचा असतो. खरीपानंतर काही प्रमाणात आर्थिक सावरण्याची संधी या हंगामातून मिळते. मात्र, अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे अनेक भागांमध्ये काढणीला आलेली पिके अक्षरशः मातीमोल झाली. विदर्भात हरभऱ्याचे, मराठवाड्यात ज्वारी-गव्हाचे नुकसान झाले, तर कोकणात आंबा आणि काजूच्या मोहोरावर परिणाम झाला. हवामानातील अनिश्चिततेमुळे शेतीचा धोका अधिक वाढत असल्याचे चित्र यातून स्पष्ट होते.

अलीकडच्या काळात हवामानाचे बदलते स्वरूप चिंतेचा विषय ठरले आहे. पावसाचे पारंपरिक वेळापत्रक ढासळताना दिसते. मे महिन्यातील अनियमित पाऊस, जानेवारी-फेब्रुवारीतील गारपीट आणि हंगामाबाहेरील पर्जन्य या घटना वारंवार घडू लागल्या आहेत. ग्लोबल



वॉर्मिंग आणि पर्यावरणीय असंतुलन यांचा परिणाम शेतीवर अधिक तीव्रतेने जाणवत आहे. त्यामुळे शेती हा बेभरवशी व्यवसाय ठरत चालल्याची भावना शेतकऱ्यांत वाढत आहे.

या पार्श्वभूमीवर बदलत्या हवामानाचा सखोल अभ्यास करणे अत्यावश्यक आहे. हवामान तज्ञ आणि कृषितज्ञ यांनी एकत्रितपणे नवीन पीकपद्धती, हवामानानुसार लागवड नियोजन आणि तंत्रज्ञानाधारित उपाय सुचवणे गरजेचे आहे. हवामान अनुकूल शेती, जलसंवर्धन, सूक्ष्म सिंचन आणि पीकविविधीकरण यावर भर दिला, तर जोखीम काही प्रमाणात कमी होऊ शकते.

तितकेच महत्त्वाचे म्हणजे तातडीची मदत व्यवस्था. अवकाळीनंतर पंचनामे आणि भरपाईची प्रक्रिया संथ असते, ही शेतकऱ्यांची प्रमुख तक्रार आहे. नुकसानग्रस्तांना त्वरीत आर्थिक मदत, पीकविम्याची सुलभ अंमलबजावणी आणि कर्जमाफीसारखे दिलासादायक निर्णय आवश्यक आहेत. अन्यथा शेतीतून बाहेर पडणाऱ्यांची संख्या वाढण्याची भीती नाकारता येत नाही.

शेती हा केवळ व्यवसाय नसून अन्नसुरक्षेचा कणा आहे. त्यामुळे पर्यावरण संवर्धनालाही तितकेच महत्त्व द्यावे लागेल. वृक्षतोड रोखणे, जलस्रोतांचे संरक्षण, प्रदूषण नियंत्रण आणि शाश्वत विकासाच्या उपाययोजना यावर सर्वांनी सामूहिकपणे काम करणे गरजेचे आहे. शासन, तज्ञ आणि समाज यांनी समन्वयाने प्रयत्न केल्यासच अवकाळी संकटावर मात करता येईल. अन्यथा बदलत्या हवामानाचा सर्वाधिक फटका शेतकऱ्यांनाच बसत राहील.

## ।। अभंगवाणी ।।



रुपी जडले लोचन ।
पायी स्थिरावले मन॥१॥

देहभाव हरपला ।
तुज पाहतां विठ्ठला ॥२॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# राष्ट्रपतींच्या हेलिपॅडवर कोटींची उधळपट्टी?

## ४ कोटींचे हेलिपॅड आता उखडणार? शेगावमधील खर्चावरून वाद

**महाईन्यूज । अकोला**

**केंद्र सरकारचे आयुष मंत्रालय व अखिल भारतीय आयुर्वेद महासंमेलनाच्यावतीने बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव येथे आयोजित राष्ट्रीय आरोग्य मेळाव्याच्या उद्घाटनाला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू २५ फेब्रुवारीला शेगावला येथे आल्या होत्या.राष्ट्रपतींचे हेलिकॉप्टर उतरण्यासाठी संस्थानच्या जागेवर हेलिपॅड निर्माण केले होते. त्यासाठी तब्बल ४.१० कोटी रुपयांची निविदा काढण्यात आली.**



आता ते हेलिपॅड उखडण्यात देखील येणार आहे. शासकीय निधीचा हा एकप्रकारे चुराडा असून या मेळाव्यासाठी १० ते १५ कोटींची उधळपट्टी केल्याचा गंभीर आरोप काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला. केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्यावरही त्यांनी गंभीर आरोप केले आहेत.शेगावमध्ये आयुष मंत्रालयाकडून आरोग्य मेळावा घेतला जात आहे.

याच मुद्द्यावरून काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी समाज माध्यमावर पोस्ट करीत केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधवांवर निशाणा साधला.

मेळाव्याचा फायदा एकाही शेतकऱ्याला झाला नाही. या मेळाव्याच्या उद्घाटनासाठी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू येऊन गेल्या. संत गजानन महाराज संस्थानने एक रुपयाही न घेता तीन हेलिकॉप्टर उतरविण्यासाठी जागा नि:शुल्क दिली.

या जागेवर तब्बल चार कोटी १० लाख रुपयांचा निधी खर्च करून हेलिपॅड बनविण्यात आले. राष्ट्रपती निघून गेल्यानंतर आता हे हेलिपॅड उखडण्यात येणार आहे. हे हेलिपॅड बनविण्याचे कंत्राट देखील केंद्रीय आयुष मंत्र्यांच्या निकटवर्तीयालाच देण्यात आल्याचे समजते, असा गंभीर आरोप हर्षवर्धन सपकाळ यांनी केला.

### लाभार्थी केवळ मंत्री आणि त्यांचे समर्थकच

मेळाव्यासाठी एकूण १० ते १५ कोटींचा खर्च केल्याचा अंदाज आहे. या आरोग्य शिबिरापासून शेतकऱ्यांना किंवा सर्वसामान्यांना कुठलाच फायदा न झाल्याने ही देखील शासकीय पैश्याची उधळपट्टी ठरली. आयुष मंत्रालयाच्या राष्ट्रीय शिबिरामध्ये ७० दालनांचे नियोजन होते. प्रत्यक्षात २० ते २५ दालने लागले. नागरिकांनी याकडे पाठ फिरवली. नियोजनाअभावी ते सपशेल अपयशी ठरले. जनतेच्या कोट्यवधी रुपयांची नियोजनशून्य उधळपट्टी करून त्याचे लाभार्थी केवळ मंत्री आणि त्यांचे समर्थक असल्याचा गंभीर आरोप सुद्धा हर्षवर्धन सपकाळ यांनी पोस्टमध्ये केला आहे.

### तर हेलिपॅडचा कायमस्वरूपी उपयोग

हेलिपॅड बनवण्याला विरोध नाही. मात्र, हेच हेलिपॅड थोडी दूरदृष्टी दाखवून शेगावातील सरकारी जागेवर तयार केले असते तर त्याचा कायमस्वरुपी उपयोग झाला असता. केवळ दोन दिवसांसाठी सामान्य जनता आणि शेतकऱ्यांच्या चार कोटी १० लाख रुपयांच्या शासकीय निधीचा एकप्रकारे चुराडा झाला. थोडे नियोजन केले असते, तर शेगावला कायमस्वरूपी हेलिपॅड मिळाले असते. संबंधित मंत्र्यांनी ही संधी घालवली, अशी टीका सपकाळ यांनी केली.

# जावळी पंचायत समितीच्या गटनेतेपदी सौरभ शिंदे यांची निवड

**महाईन्यूज । कुडाळ**

**जावळी तालुक्याच्या राजकारणात आज मोठ्या घडामोडी पाहायला मिळाल्या. भारतीय जनता पार्टीच्या जावली पंचायत समितीच्या गटनेतेपदी कुडाळ गणातून विजयी झालेले पंचायत समिती सदस्य व प्रतापगड साखर कारखान्याचे अध्यक्ष सौरभ शिंदे यांची अधिकृत निवड करण्यात आली आहे. सार्वजनिक बांधकाम मंत्री नामदार शिवेंद्रराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली या महत्त्वाच्या नावांची घोषणा करण्यात आली. तसेच जावळी पंचायत समितीच्या गटनेते पदी अधिकृत निवड झाल्याबाबतचे पत्र जिल्हाधिकारी संतोष पाटील यांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आले.**



सातारा येथील नामदार शिवेंद्रराजे भोसले यांच्या सुरूची या निवासस्थानी पंचायत समिती सदस्यांची एक विशेष बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला भाजपाचे नवनिर्वाचित सदस्य गोरख महाडीक व सौ. चारूशिला पवार यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी नामदार शिवेंद्रराजे भोसले यांनी सदस्यांना मार्गदर्शन करताना आगामी काळातील कामाची दिशा स्पष्ट केली आणि पक्ष संघटना मजबुतीसाठी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांच्या नावाची घोषणा केली. बैठकीत मार्गदर्शन करताना नामदार भोसले म्हणाले, "तुम्ही सर्वजण मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली आणि भाजपाच्या ध्येयधोरणांमुळे विजयी झालेले आहात. तुम्ही निवडून आल्यामुळे आता खरी जबाबदारी सुरू झाली असून, सर्व सदस्यांनी पक्षाच्या कार्यकर्त्यांना व समाजातील विविध घटकांना न्याय दिला पाहिजे. पक्षाचे काम प्रामाणिकपणे व अधिक जोमाने तळागाळापर्यंत पोहोचवा." तसेच सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडवावेत आणि ज्या कार्यकर्त्यांनी विजयासाठी मेहनत घेतली आहे, त्यांनाही न्याय द्यावा अशा सूचनाही भोसले यांनी यावेळी दिल्या.

सौरभ शिंदे यांच्या निवडीमुळे जावली पंचायत समितीत सत्ताधारी पक्षाची पकड अधिक मजबूत होणार असून, अनुभवी नेतृत्वाखाली तालुक्याचा विकास वेगवान होईल, असा विश्वासही व्यक्त केला. सौरभ शिंदे यांच्या निवडीमुळे तालुक्यातील मान्यवरांसह कार्यकर्त्यांनी त्यांचे अभिनंदन केले.

# नॉर्वेच्या माजी पंतप्रधानांचा आत्महत्येचा प्रयत्न

## एपस्टीन फाइल्समध्ये नाव : भ्रष्टाचार प्रकरणी 10 वर्षांची शिक्षा शक्य

**महाईन्यूज । ओस्लो**

**नॉर्वेचे माजी पंतप्रधान थोरब्योर्न जगलँड यांना आत्महत्येच्या प्रयत्नानंतर रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. हे पूर्ण प्रकरण लैंगिक गुन्हेगार जेफ्री एपस्टीनसोबतच्या त्यांच्या संबंधांवरून सुरू असलेल्या चौकशीशी निगडित आहे. जगलँड यांच्यावर 'एग्रेवेटेड करप्शन' म्हणजे 'गंभीर भ्रष्टाचारा'चाही आरोप असून याकरता कमाल 10 वर्षांची शिक्षा होण्याची शक्यता आहे.**

नॉर्वेची आर्थिक गुन्हे तपास संस्था 'ओकोक्रिम' याप्रकरणी तपास करत आहे. जगलँड विरोधात तपास करण्यासाठी ठोस आधार आहे. चौकशी अंतर्गत ओस्लो येथील त्यांचे निवासस्थान आणि दोन अन्य मालमत्तांमध्ये झडती घेण्यात आल्याची माहिती ओकोक्रिमचे संचालक पॉल लोनसेथ यांनी दिली.

पंतप्रधान पदावर असताना जगलँड यांना भेटवस्तू, कर्ज किंवा अन्य लाभ मिळाले होते का याचाही तपास केला जात आहे. तर झडती घेतल्यावर जगलँड यांना औपचारिक स्वरुपात संशयिताचा दर्जा देण्यात आला असून आता त्यांची चौकशी केली जाणार आहे.



### संबंध चुकीचे होते : जगलँड

जगलँड हे 1996-97 दरम्यान नॉर्वेचे पंतप्रधान होते. याचबरोबर ते विदेशमंत्री, नॉर्वेजियन नोबेल कमिटीचे अध्यक्ष (2009-15) आणि युरोपची मानवाधिकार संस्था कौन्सिल ऑफ युरोपचे महासचिव (2009-19) देखील राहिले आहेत. एपस्टीनोबतचे माझे संबंध 'चुकीचा निर्णय' किंवा 'खराब विचारा'चा परिणाम होते. परंतु मी कुठलेच अवैध कृत्य केलेले नाही. तपासात मी पूर्ण सहकार्य करणार असून सत्य पूर्णपणे समोर यावे अशी इच्छा असल्याचे जगलँड यांनी म्हटले आहे.

### एपस्टिनच्या संपत्तींचा अनेकदा दौरा

अमेरिकेच्या न्याय विभागाकडून 30 जानेवारी रोजी जारी दस्तऐवजांमधून जगलँड आणि त्यांचा परिवार अनेकदा एपस्टीनच्या पॅरिस, न्यूयॉर्क आणि पाम बीच येथील संपत्तीवर गेला होता असे समोर आले. एपस्टीनने जगलँड यांच्याकडे रशियाचे राष्ट्रपती ब्लादिमीर पुतीन यांची भेट घडवून आणण्यासाठी मदत मागितली होती. तसेच तो स्वतःच्या काही व्यावसायिक आणि आर्थिक योजना पुढे नेण्यासाठी मदत इच्छित होता. दस्तऐवजांमध्ये जगलँड यांना 'नोबेल बिग शॉट' म्हटले गेले आहे. जगलँड यांची प्रतिष्ठा अन् ओळख एपस्टीनच्या कामी येत होती. तर दुसरीकडे एपस्टीन त्यांना लक्झरी ट्रीप, भेटवस्तू अन् इतर सुविधा पुरवत होता. परंतु तपास यंत्रणांनी जगलँड यांचे नाव एपस्टीनच्या लैंगिक गुन्ह्यांशी जोडलेले नसल्याचे स्पष्ट केले आहे.

# आठवीच्या पुस्तकातील न्यायालय धड्यावर पंतप्रधान मोदींची नाराजी

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**नॅशनल कौन्सिल ऑफ एज्युकेशनल रिसर्च अँड ट्रेनिंग अर्थात एनसीईआरटीने प्रकाशित केलेल्या इयत्ता आठवीच्या सामाजिक शास्त्राच्या पाठ्यपुस्तकातील एका धड्यावरून वाद निर्माण झाला आहे. या पुस्तकात 'समाजातील न्यायपालिकेची भूमिका' या धड्याचा समावेश करण्यात आला असून यामध्ये 'न्यायपालिकेतील भ्रष्टाचार' या विषयाचा समावेश करण्यात आला आहे. या प्रकरणाची आता पंतप्रधान मोदी यांनी देखील दखल घेतली आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत नरेंद्र मोदी यांनी याबद्दल नाराजी व्यक्त केली.**

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी असलेल्या अभ्यासक्रमात न्यायव्यवस्थेशी निगडीत भ्रष्टाचाराच्या प्रकरणाचा समावेश करण्यावर पंतप्रधानांनी आक्षेप घेतला आहे. तसेच त्यांनी या विषयाची योग्यता आणि याला मंजूरी देण्याची प्रक्रिया या दोन्हीवर प्रश्न उपस्थित केले.

"आपण आठवीत शिकणाऱ्या मुलांना न्यायालयीन भ्रष्टाचाराबद्दल काय शिकवत आहोत?" असा सवाल पंतप्रधान मोदी यांनी बैठकीदरम्यान उपस्थित केला असे सूत्रांनी सांगितले.

तसेच पंतप्रधानांनी देखरेखीकडे झालेल्या दुर्लक्षाबद्दलही चिंता व्यक्त केली. असा मजकूर शालेय वर्गांपर्यंत पोहोचण्यापूर्वी त्याची देखरेख आणि मंजूरीचे काम कोण करत होते, असा सवाल त्यांनी केला.याबरोबरच शिक्षणाच्या इतक्या सुरुवातीच्या टप्प्यावर विद्यार्थ्यांना असे संवेदनशील संस्थात्मक समस्या शिकवल्या जात असल्याबद्दल त्यांच्या वक्तव्यातून अस्वस्थता दिसून आली.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या पाठ्यपुस्तकात न्यायव्यवस्थेतील भ्रष्टाचाराशी संबंधित एका प्रकरणाचा समावेश करण्यात आला होता, ज्याची आता सरकारकडून छाननी केली जात आहे. दरम्यान या मजकूरामध्ये सुधारणा केली जाईल किंवा तो काढून टाकला जाईल याबद्दल याबद्दल अधिकृतपणे अद्याप काहीही माहिती देण्यात आलेली नाही.



### नव्या पुस्तकातील धड्यात कोणत्या मुद्यांचा समावेश?

आठवीच्या पुस्तकातील या धड्यात न्यायव्यवस्थेसमोरील आव्हानांचा समावेश करण्यात आला आहे. यामधअये न्यायव्यवस्थेमध्ये विविध स्तरांवर होणारा भ्रष्टाचार आणि प्रलंबित खटल्यांबाबत चिंता व्यक्त करण्यात आली. तसेच, खटल्यांच्या विलंबासाठी न्यायाधीशांची अपुरी संख्या, किचकट कायदेशीर प्रक्रिया आणि अपुऱ्या पायभूत सुविधा अशा कारणांचा समावेश केला आहे.

### कारणे दाखवा नोटीस

दरम्यान या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने एनसीईआरटी संचालक आणि शालेय शिक्षण सचिवांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. पाठ्यपुस्तकातील वादग्रस्त मजकुराबाबत त्यांच्यावर कारवाई का करू नये हे स्पष्ट करावे, असे न्यायालयाने विचारले आहे. दरम्यान, सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी शिक्षण मंत्रालयाच्या वतीने न्यायालयाची बिनशर्त माफी मागितली आहे.



# गोड हास्याची भूरळ

छावा चित्रपटातून प्रेक्षकांच्या घराघरात पोहोचलेला लोकप्रिय अभिनेता विकी कौशल सध्या चाहत्यांमध्ये चर्चेत आहे. त्याचं कारण म्हणजे त्याने पत्नी कतरीना कैफबद्दल केलेलं वक्तव्य. विकी आणि कतरीना गेल्या वर्षी २१ नोव्हेंबर २०२५ रोजी आई-बाबा बनले. अभिनेत्रीने एका गोंडस मुलाला जन्म दिला. त्यांनी त्याचं नाव विहान ठेवलंय. आता नुकत्याच एका पुरस्कार सोहळ्यात विकीने कतरीनाचं कौतुक केलंय. प्रेग्नन्सीमध्ये कतरीनाने स्वतःला कसं सांभाळलं हे त्याने सांगितलंय. 'द हॉलीवूड रिपोर्टर इंडिया'चा पुरस्कार सोहळा नुकताच मुंबईत पार पडला. यात विकीला अभिनेत्री नेहा धुपियाने प्रश्न विचारताना म्हटलं, 'बाबा झाल्यावर आता कसं वाटतंय?' त्यावर बोलताना विकी म्हणाला, 'बाबा म्हणून खूप छान वाटतंय. माझा मुलगा विहान आता तीन महिन्यांचा आहे. खरं तर, बाळ इतकं लहान असताना वडिलांकडे करण्यासारखं फार कमी असतं. मी सध्या फक्त आई आणि बाळासाठी एक 'चीअरलीडर' म्हणून काम करतोय. तो थोडा मोठा झाला की मग मी अधिक योगदान देऊ शकेन.' त्यानंतर कतरिनाचं कौतुक करत विकी म्हणाला, 'सध्या कतरिना खऱ्या अर्थाने एक सुपरहिरो आहे. गरोदरपणाचा काळ तिने ज्या हिमतीने सांभाळला आणि आता ती ज्या प्रकारे मातृत्वाची जबाबदारी पार पाडतेय, ते पाहून मला तिचा प्रचंड अभिमान वाटतो. ती एक खरी 'योद्धा' आहे आणि माझं तिच्यावर खूप प्रेम आहे.' विकीच्या कामाबद्दल सांगायचं तर तो लवकरच संजय लीला भन्साळींच्या 'लव्ह अँड वॉर' मध्ये रणबीर कपूर आणि आलिया भट्टसोबत दिसणार आहे.



# पूनम पांडेला अश्रू अनावर

आपल्या बोल्डनेससाठी ओळखली जाणारी पूनम पांडे अलीकडेच प्रेमानंद महाराजांना भेटण्यासाठी वृंदावनला गेली होती. त्यांचे प्रवचन ऐकून अभिनेत्रीला अश्रू अनावर झाले. सध्या सोशल मीडियावर एक व्हिडिओ व्हायरल होत आहे ज्यामध्ये पूनम पांडे इतर भक्तांसोबत बसून प्रेमानंद महाराजांचे प्रवचन ऐकताना दिसतेय, त्यावेळी तिच्या डोळ्यांमधून अश्रूसुद्धा वाहतायत. आणखी एका व्हिडिओमध्ये, ती वृंदावनमधील मंदिरात प्रार्थना करताना दिसत आहे. पूनम धार्मिक स्थळी जाऊन कृष्ण भक्तीत तल्लीन झाल्याचे दिसते. पूनम पांडेचे नाव अनेकदा वेगवेगळ्या वादांमध्ये येत असते. दोन वर्षांपूर्वी आपल्याच मृत्यूची अफवा पसरवल्याबद्दल अभिनेत्रीवर जोरदार टीका झाली होती, त्यानंतर तिने अलीकडेच क्रिकेटपटू तिला मेसेज करतात असा दावा करून खळबळ उडवली. एका क्रिकेटपटूने तिला भेटण्यासाठी मेसेज केला होता, परंतु तिने त्याला ब्लॉक केले असे ती म्हणालेली. आपल्या बोल्डनेससाठी प्रसिद्ध असलेल्या पूनमची ही वेगळी धार्मिक बाजू पाहून अनेकांना आश्चर्य वाटले आहे. काहीजण तिचे कौतुक करत आहेत तर काही जण तिची खिल्ली उडवत आहेत. एका युझरने लिहिले, "ही तीच व्यक्ती ना जी मेल्यानंतर पुन्हा जीवंत झाली?." दुसऱ्याने कमेंट केली, "एका विशिष्ट टप्प्यानंतर, देवाच्या चरणीच शांती मिळते." दुसऱ्याने म्हटले, "जर तू चांगले जीवन सुरू केले असेल, तर पुन्हा कधीही काहीही चुकीच्या मार्गावर जाऊ नको." दुसऱ्या युझर म्हटले, "आधी सर्वांना उद्ध्वस्त केले आणि नंतर स्वतःला सुधारतेय." दुसऱ्याने लिहिले, "आता इथे आलीच आहेस तर स्वतःला सुधारा." दुसऱ्याने म्हटले, "100 उंदीर खाल्ल्यानंतर मांजर हजला गेली." प्रेमानंद जी महाराजांना भेटल्यानंतर पूनम पांडे काय म्हणाली : प्रवचनावेळी पूनमचा एक प्रश्न निवडलेला पण महाराजांची तब्येत ठिक नसल्यामुळे तिला त्या प्रश्नाचे उत्तर मिळू शकले नाही. लोकमत टाइम्सने दिलेल्या माहितीनुसार पूनम म्हणाली, की ती नेहमीच तिच्या आईसोबत प्रेमानंद महाराजांच्या सत्संगला उपस्थित राहते. त्यांची शिकवण ऐकून तिच्या घरात आता शांतता निर्माण झाली आहे. वृंदावनमध्ये प्रेमानंद जी महाराजांना भेटणे खरोखरच एका दिव्य अनुभवात प्रवेश करण्यासारखे असते, असेही पूनम पांडे म्हणाली. पूनम पांडे पुढे म्हणाली की, प्रेमानंद महाराज बोलतात तेव्हा असे वाटते की देवाने संदेश देण्यासाठी एक विशेष आवाज निवडला आहे. त्यांच्या शब्दांमध्ये एक विशेष पवित्रता आणि भक्ती आहे जी मनात खोलवर प्रतिध्वनित होते. आपण ती केवळ ऐकत नाही तर ते अनुभवतो. पूनम आता एप्रिलमध्ये तिच्या आईसोबत प्रेमानंद महाराजांना भेटण्यासाठी पुन्हा वृंदावनला जाणार आहे. पूनम पांडेच्या आधी काही आठवड्यांपूर्वी, अनुष्का शर्मा आणि विराट कोहली हे जोडपे प्रेमानंद महाराजांना भेटण्यासाठी वृंदावनला गेले होते. या दोघांनीही यापूर्वी तीन-चार वेळा प्रेमानंद महाराजांची भेट घेतली आहे. तसेच आशुतोष राणा, गायक बी प्राक, शिल्पा शेट्टी-राज कुंद्रा, द ग्रेट खली, बादशाह आणि हेमा मालिनी या सेलिब्रिटींनी ही महाराजांची भेट घेतली आहे.

# दाक्षिणात्य चित्रपटांत बेंबी दाखविण्यावर भर...

अभिनेत्री तापसी पन्नू हिने चित्रपटसृष्टीत महिलांच्या शरीराकडे पाहण्याच्या दृष्टिकोनाबाबत स्पष्ट - भूमिका मांडली आहे. शुभंकर मिश्रा यांच्यासोबतच्या संवादात तिने दक्षिण भारतीय आणि हिंदी चित्रपटांतील गाण्यांमध्ये बेंबीसोबत अनेक दृश्ये असतात, त्यावर भाष्य केले. तिच्या मते, हिंदी चित्रपटांतील आयटम साँगमध्येही शरीराचे प्रदर्शन असते; मात्र दक्षिण चित्रपटांमध्ये नाभीवर अधिक लक्ष केंद्रित केले जाते, तर हिंदी चित्रपटांमध्ये क्लीवेज दाखवण्यावर जास्त भर असतो. तापसीने आपल्या करिअरच्या सुरुवातीच्या काळातील काही पडद्यामागील अनुभवही सांगितले. काही दक्षिण चित्रपटांमध्ये गाण्यांच्या शूटदरम्यान अभिनेत्रीला पंडेड ब्रा घालण्याच्या सूचना दिल्या जात असल्याचे तिने नमूद केले. अशा सूचना दिग्दर्शकाकडून सहायक दिग्दर्शक, त्यानंतर स्टायलिंग आणि वॉर्डरोब टीममार्फत अभिनेत्रीपर्यंत पोहोचतात, ही पद्धत लाजिरवाणी ठरू शकते, असे ती म्हणाली. तापसीने २०१० मध्ये 'झुम्मंडी नादाम' या तेलुगू चित्रपटातून पदार्पण केले. पुढे बेबी आणि पिंक यांसारख्या चित्रपटांमुळे तिला हिंदी चित्रपटसृष्टीत विशेष ओळख मिळाली.



# दक्षिण आफ्रिकेचे सेमीफायनलच्या दिशेने पाऊल

## वेस्ट इंडिजला पराभूत करत टी२० वर्ल्ड कपच्या सुपर -८ फेरीत सलग दुसरा विजय

**महाईन्यूज I मुंबई**

**दक्षिण आफ्रिकेने सर्वांगीण खेळ कायम राखत टी२० वर्ल्डकपमध्ये वेस्ट इंडिजवर ९ विकेट्सनी दणदणीत विजय मिळवला. या विजयासह दक्षिण आफ्रिकेने सेमी फायनल फेरीतलं स्थान जवळपास पक्कं केलं आहे. दक्षिण आफ्रिकेने यजमान भारत आणि वेस्ट इंडिजला नमवत सेमी फायनलमध्ये जवळजवळ प्रवेश केला आहे. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर वेस्ट इंडिजने दिलेलं १७७ धावांचं आव्हान आफ्रिकेने २३ चेंडू आणि ९ विकेट्स राखून पार केलं. दक्षिण आफ्रिकेचे दोन सामन्यात ४ गुण झाले असून त्यांचा नेट रनरेटही उत्तम आहे.**






आफ्रिकेचा कर्णधार एडन मारक्रमने टॉस जिंकून बॉलिंगचा निर्णय घेतला तेव्हा अनेकांच्या भुवया उंचावल्या. मात्र त्यांच्या गोलंदाजांनी अत्यंत शिस्तबद्ध मारा करत वेस्ट इंडिजच्या ताकदवान फटकेबाजांना रोखलं. कर्णधार शे होपने चांगली सुरुवात केली होती. मात्र कागिसो रबाडा आणि लुंगी एन्गिडी यांनी अचूक टप्प्यावर गोलंदाजी करत वेस्ट इंडिजच्या फलंदाजांना सापळ्यात रचलं. शिमोरन हेटमायरला पहिल्याच चेंडूवर जीवदान मिळालं मात्र तो त्याच षटकात तंबूत परतला. ८३/७ स्थितीतून जेसन होल्डर आणि रोमारिओ शेफर्ड यांनी महत्त्वपूर्ण भागीदारी केली. यामुळे वेस्ट इंडिजला १७६ धावांची मजल मारता आली. आफ्रिकेतर्फे लुंगी एन्गिडीने ३ तर कागिसो रबाडा आणि कार्बिन बॉश यांनी प्रत्येकी २ विकेट्स पटकावल्या.

प्रत्युत्तरादाखल खेळताना एडन मारक्रमने आक्रमक पवित्रा स्वीकारला. क्विंटन डी कॉकने कर्णधाराचा कित्ता गिरवत मनमुराद फटकेबाजी सुरू केली. या दोघांनी ९५ धावांची सलामी देत विजयाचा पाया रचला. क्विंटन बाद झाल्यानंतर रायल रिकलटनने कर्णधाराला साथ देली. मारक्रमने ४६ चेंडूत ८२ धावांची खेळी करत सूत्रधाराची भूमिका निभावली. रिकलटनने २८ चेंडूत ४५ धावा करत त्याला चांगली साथ दिली. वेस्ट इंडिजच्या गोलंदाजांना विकेट्स पटकावणं आणि धावा रोखणं या दोन्ही आघाड्यांवर अपयश आलं. एडन मारक्रमलाच सामनावीर पुरस्काराने गौरवण्यात आलं.

दरम्यान दक्षिण आफ्रिकेच्या सेमीफायनल प्रवेशासह टीम इंडियासाठी समीकरण स्पष्ट झालं आहे. भारतीय संघाला वेस्ट इंडिज आणि झिम्बाब्वे यांना नमवणं क्रमप्राप्त आहे. भारताने दोन्ही लढतीत विजय मिळवल्यास गणितीय समीकरणांविना त्यांचा सेमी फायनल प्रवेश पक्का होईल. भारत आणि झिम्बाब्वे यांच्यातला मुकाबला काही वेळात चेन्नई इथे सुरू होत आहे.

# रणजी स्पर्धेत ५५ विकेट्स घेणारा, वेगाचा नवा बादशाह...

**महाईन्यूज I मुंबई**

**रणजी करंडक स्पर्धेच्या २०२५-२६ च्या पर्वात एक नाव सध्या जास्त चर्चेत आले आहे... ते म्हणजे औकिब नबी... जम्मू काश्मीर संघाने रणजी करंडक स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश करताना इतिहास घडवला. जम्मू काश्मीरच्या या ऐतिहासिक कामगिरीत वेगवान गोलंदाज औकिब नबी याचा सिंहाचा वाटा आहे आणि अंतिम सामन्यात त्याने कर्नाटकच्या नाकी नऊ आणले आहेत. लोकेश राहुल, करुण नायर या भारतीय संघातील स्टार फलंदाजांना अकिबने रणजी फायनलमध्ये घरचा रस्ता दाखवला... KL RAHUL तर त्याच्या गोलंदाजीसमोर चाचपडलाच होता. औकिब नबीची ही कामगिरी सर्वांना अचंबित करणारी आणि कौतुकास पात्र ठरतेय.**





जम्मू-काश्मीरमधील बारामूलासारख्या भागातून येऊन राष्ट्रीय स्तरावर छाप पाडणे ही स्वतःमध्ये मोठी कामगिरी आहे. त्याची गोलंदाजीतील धार, नव्या चेंडूवरील नियंत्रण आणि डेथ ओव्हर्समधील प्रभावी मारा यामुळे तो लवकरच भारतीय संघात दिसेल, असा दावा आता केला जातोय. भारतीय संघाला सातत्यपूर्ण वेगवान गोलंदाजांची गरज असताना, औकिब नबीसारखा तरुण गोलंदाज भविष्यात मोठी भूमिका बजावू शकतो. भारतीय संघाचा माजी फलंदाज दिनेश कार्तिक ( DINESH KARTHIK) यानेही औकिबचे कौतुक केले आहे. त्याने ट्विट केले की,"रणजी ट्रॉफीचे हे पर्व पाहताना आणि त्याचे बारकाईने अनुसरण करताना, मी एक गोष्ट निश्चितपणे सांगू शकतो की, हा खेळ खेळणाऱ्या आणि देशाचे प्रतिनिधित्व करू इच्छिणाऱ्या सर्व तरुण मुला-मुलींसाठी, औकिब नबी हा प्रेरणास्तान ठरतोय. त्याने जी कामगिरी केलीय, ती मागील बऱ्याच वर्षांपासून एखाद्या वेगवान गोलंदाजाकडून पाहायला मिळालेली नाही.

सुरुवातीपासून शेवटपर्यंत वर्चस्व आणि जवळजवळ एकट्याने संघासाठी ही स्थानिक स्पर्धा जिंकली आहे. राष्ट्रीय संघात स्थान मिळवण्यासाठी ही कामगिरी महत्त्वाची ठरणार आहे." "या संपूर्ण मोहिमेत तंदुरुस्ती, लांब स्पेल आणि वेगवेगळ्या मातीत गोलंदाजी करणे, हवामानाशी जुळवून आणि वेगवान गोलंदाजाला मदत करणारी खेळपट्टी नसतानाही तो त्याच्या संघासाठी प्रत्येक वेळी विश्वासाने उभा राहिला आहे. औकिब, तू एक परिपूर्ण विजेता आहेस आणि आशा करतो की तुला भरपूर यश मिळेल," असेही DK ने लिहिले. "इच्छाशक्ती, कौशल्य आणि लवचिकतेतून यशाचे दार कसे उघडले जाते," हे तू दाखवलेस.

स्मार्ट PCMC SMART CITY
# महाईन्यूज ™
ePaper
epaper.mahaenews.com
। शुक्रवार ।
दि. 27 फेब्रुवारी 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## ऑपरेशन मुस्कान–१४’ मध्ये १२१ बालके सुरक्षित

# पिंपरी चिंचवड पोलिसांची दमदार कामगिरी!

**महाईन्यूज ।**
**पिंपरी-चिंचवड**

**खवलेल्या बालकांचा शोध घेण्यासाठी राबविण्यात आलेल्या "ऑपरेशन मुस्कान – १४" या विशेष मोहिमेत पिंपरी चिंचवड पोलिसांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. पोलिसांनी या मोहिमेअंतर्गत हरवलेली तब्बल १२१ बालकांचा शोध घेऊन सुखरूपपणे पालकांच्या ताब्यात देण्यात आले आहेत. दि.२० जानेवारी २०२६ ते २० फेब्रुवारी २०२६ या कालावधीत संपूर्ण महाराष्ट्र राज्यात ही मोहीम राबविण्यात आली.**




### पालकांमध्ये विश्वासाचे वातावरण

'ऑपरेशन मुस्कान'च्या या यशामुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये पोलिसांबद्दलचा विश्वास अधिक दृढ झाला आहे. आपली मुले सुरक्षितपणे घरी परतल्याने पालकांनी पोलिसांचे आभार मानले आहेत. गुन्हेगारी प्रवृत्तीला आळा घालण्यासोबतच, सामाजिक बांधिलकी जपत बालकांना सुरक्षित वातावरण देण्यासाठी पिंपरी-चिंचवड पोलीस सदैव तत्पर असल्याचे या कारवाईतून पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

### तपासाचे चक्र आणि सांघिक कामगिरी

ही मोहीम यशस्वी करण्यासाठी अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष (AHTU), गुन्हे शाखा आणि सर्व पोलीस ठाण्यांतील वरिष्ठ निरीक्षकांनी विशेष परिश्रम घेतले. तांत्रिक विश्लेषण आणि गुप्त बातमीदारांच्या मदतीने ही मुले कोठे आहेत, याचा शोध घेण्यात आला. या कामगिरीचे कौतुक पोलीस सह आयुक्त श्री. शशिकांत महावरकर, अपर पोलीस आयुक्त श्री. सारंग आवाड आणि श्री. बसवराज तेली यांनी केले आहे.

### आयुक्तांचे थेट नियंत्रण अन् पोलिसांचा धाडसी शोध

महाराष्ट्र राज्याच्या अपर पोलीस महासंचालक (महिला व बाल अपराध प्रतिबंध) यांच्या सूचनेनुसार, २० जानेवारी ते २० फेब्रुवारी २०२६ या कालावधीत संपूर्ण राज्यात ही मोहीम राबविण्यात आली. पिंपरी-चिंचवडचे पोलीस आयुक्त श्री. विनय कुमार चौबे यांनी या मोहिमेत वैयक्तिक लक्ष घालून सर्व पोलीस ठाण्यांना कडक सूचना दिल्या होत्या. सन २०१८ पासून प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा आढावा घेऊन, हरवलेल्या मुलांचा शोध घेण्यासाठी गुन्हे शाखा आणि स्थानिक पोलिसांची पथके तैनात करण्यात आली होती.

महिला व बाल अपराध प्रतिबंधक विभागाच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेल्या या मोहिमेत १८ वर्षांखालील हरवलेल्या मुला-मुलींचा शोध घेण्यावर विशेष भर देण्यात आला. त्यानुसार पिंपरी चिंचवड पोलिस आयुक्तालयातील सर्व पोलीस ठाण्यांनी समन्वय साधून विविध ठिकाणी शोध मोहीम राबवली. ऑपरेशन मुस्कान-१४ शोध मोहिमेमध्ये एकुण ११ बालके व ६० बालिका असे एकुण ७१ बालकांना शोधुन त्यांच्या पालकांच्या ताब्यात दिले आहे. तसेच दिनांक २०/०१/२०२६ ते दिनांक २०/०२/२०२६ यादरम्यान दाखल असलेल्या गुन्ह्यामध्ये २२ बालके व ५० बालिका असे एकुण ७२ बालके हरविले होते. सदर मोहिमेत त्यांचाही शोध घेवुन १६ बालके व ३४ बालिका असे एकुण ५० बालकांचा यशस्वीरित्या शोध घेतला आहे. एकंदरीत सदर मोहिमेअंतर्गत एकुण २७ बालके व ९४ बालिका अशा एकुण १२१ बालकांचा यशस्वीरित्या शोध घेवुन पालकांच्या ताब्यात दिले आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे, सह पोलीस आयुक्त शशिकांत महावकर, अपर पोलीस आयुक्त संजय आवाड तसेच संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. महिला व बाल सुरक्षा पथक, गुन्हे शाखा आणि स्थानिक पोलीस ठाण्यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे ही मोहीम यशस्वी ठरली.

हरवलेल्या बालकांच्या शोधासाठी पोलिसांनी रेल्वे स्थानके, बसस्थानके, सार्वजनिक ठिकाणे तसेच विविध संस्थांमध्ये तपास मोहीम राबवून समन्वय साधला. नागरिकांनी देखील पोलिसांना सहकार्य केल्यामुळे मोहिमेला गती मिळाली. "ऑपरेशन मुस्कान – १४" मोहिमेच्या यशामुळे अनेक कुटुंबांना दिलासा मिळाला असून, पिंपरी चिंचवड पोलिसांच्या तत्परतेचे सर्वत्र कौतुक होत आहे.



## गांजा तस्करीचा पर्दाफाश; काळेवाडीत तिघे जेरबंद

**महाईन्यूज ।**
**पिंपरी-चिंचवड**

शहरातील काळेवाडी परिसरात अंमली पदार्थविरोधी कारवाई करत पोलिसांनी तिघांना अटक केली असून त्यांच्या ताब्यातून २ लाख ६५ हजार रुपये किंमतीचा गांजा जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई (दि.२५) रोजी रागा हॉटेलसमोर, हॉटेल पाटीलवाडा कडे जाणाऱ्या सर्व्हिस रोडवर करण्यात आली.

या प्रकरणी रवि पवार, पोलीस शिपाई (गुन्हे शाखा युनिट २, पिंपरी-चिंचवड) यांनी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी प्रतीक राकेश खैरनार (वय २७, रा. हिंगवडी), मयूर धनश्याम कपाटे (वय २५, रा. अशोकनगर, पिंपरी) आणि अक्षय विजय मंधान (वय २८, रा. पिंपरी गाव) यांना अटक केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी प्रतीक खैरनार याच्या ताब्यातून ९३ ग्रॅम गांजा (किंमत अंदाजे ₹४,५५०), आरोपी मयूर कपाटे याच्याकडून ३.३० ग्रॅम गांजा (किंमत अंदाजे ₹३०,३००) तसेच आरोपी अक्षय बंधान याच्याकडून २३.४० ग्रॅम हायड्रोपोनिक गांजा (किंमत अंदाजे ₹२,३०,४००) असा एकूण मुद्देमाल जप्त करण्यात आला. एकूण जप्त अंमली पदार्थांची किंमत अंदाजे ₹२,६५,३५० इतकी आहे. आरोपी अंमली पदार्थ बेकायदेशीररीत्या विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगत असल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे. संबंधितांवर एनडीपीएस कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक नलावडे करत आहेत.

### #चित्र बोलके आहे.!




**जुनी सांगवीतील माकन चौक येथे मुख्य रस्त्यावर मोकाट जनावरांनी ठिय्या मांडला आहे. नवी सांगवी–औंधकडे जाणाऱ्या या व्यस्त मार्गावर दिवसभर वाहतुकीची मोठी वर्दळ असते. गर्दीच्या वेळी रस्त्याच्या मध्यभागी बसलेल्या जनावरांमुळे वाहतुकीचा वेग मंदावून अपघाताचा धोका वाढला आहे. नागरिकांकडून तातडीने कारवाईची मागणी होत आहे.**

# संत साई हायस्कूलमध्ये शिवजन्मोत्सव जल्लोषात

## ढोल-ताशांच्या गजरात मिरवणूक, विद्यार्थ्यांच्या प्रभावी सादरीकरणांनी परिसर शिवमय

**महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड**

**भोसरी येथील संत साई इंग्लिश मीडियम हायस्कूलमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांचा शिवजन्मोत्सव सांस्कृतिक व धार्मिक वातावरणात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. ढोल-ताशांच्या गजरात शिवरायांच्या मूर्ती व प्रतिमेचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ७.३० वाजता मशाल पेटवून करण्यात आली. शिक्षक व विद्यार्थ्यांनी भव्य मिरवणूक काढून परिसर शिवमय केला.**




> छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार हे केवळ इतिहासापुरते मर्यादित नसून ते आजच्या पिढीसाठीही मार्गदर्शक आहेत. विद्यार्थ्यांनी देव, देश आणि धर्मनिष्ठा जपत शिवरायांचे शौर्य, प्रामाणिकपणा आणि दूरदृष्टी हे गुण अंगीकारले तरच खऱ्या अर्थाने शिवजन्मोत्सव साजरा झाल्याचे समाधान मिळेल.
>
> – रवि लांडगे, महापौर, पिंपरी-चिंचवड.

लांडेवाडी येथील शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून पुष्पवृष्टी करण्यात आली. "जय शिवाजी, जय भवानी" आणि "हर हर महादेव"च्या घोषणांनी वातावरण दुमदुमून गेले.

संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शिवलिंग ढवळेश्वर, पिंपरी-चिंचवडचे महापौर रवीभाऊ लांडगे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून औपचारिक कार्यक्रमास प्रारंभ झाला. उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक सौ. श्वेता नारायणगावकर यांनी केले.

विद्यार्थ्यांनी शिवचरित्रावर आधारित विविध कलाकृती सादर करून उपस्थितांची मने जिंकली. अफजलखान वध, शाहिस्तेखानाचा कोथळा, "गड आला पण सिंह गेला" यांसारख्या ऐतिहासिक प्रसंगांचे नाट्यरूपांतर प्रभावी ठरले. इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेली शिवाजी महाराजांची भव्य प्रवेशिका व देशभक्तीपर गीत हे कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले. कु. आर्या गुरव हिने राजमाता जिजाऊ यांच्या जीवनावर आधारित एकांकिका सादर केली, तर अवनी हांडे हिने शौर्यगीत सादर केले. इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांनी पाळणा, पोवाडे, शिवगर्जना आदी सादरीकरणांमधून रंगत वाढवली.

ओजस मांजरे (८ अ) याने प्रभावी शिवगर्जना सादर करताना शिवरायांचे नेतृत्वगुण, शौर्य व दूरदृष्टी यांवर भाष्य केले. "अधर्म जगी झाला पार", "राज आलं राज आलं", "पाळणा झुलवा बाल शिवाजीचा" यांसारखी गीते सादर करण्यात आली. भगव्या झेंड्यांनी सजलेल्या परिसरात शिवस्वराज्याची अनुभूती उपस्थितांना मिळाली.

प्रमुख अतिथी महापौर रवीभाऊ लांडगे यांनी विद्यार्थ्यांना देव, देश व धर्मनिष्ठा याविषयी मार्गदर्शन केले. संस्थापक अध्यक्ष शिवलिंग ढवळेश्वर यांनी शिवरायांचे किमान पाच गुण अंगीकारण्याचे आवाहन केले. "शिवरायांचे विचार वंदनीय असून त्यांचे आचरण प्रत्येकाने केले पाहिजे," असे ते म्हणाले.

कार्यक्रमास संचालिका सुनीता ढवळेश्वर, विश्वस्त पायल ढवळेश्वर, रूपाली खोल्लम, रिया पोतदार, मालन लिगाडे, सुहासिनी बडोले, संजय अनार्थे, मनोज वाबळे, अक्षय राणे, प्रमोद शिंदे, स्वाती मोघे यांसह शिक्षकवृंद उपस्थित होते. सूत्रसंचालन स्वरूप कारले व अर्पिता मुले यांनी केले, तर आभार प्रदर्शन उत्सवी जांभूळकर हिने केले. हा शिवजन्मोत्सव उत्साहात आणि यशस्वीरीत्या पार पडून विद्यार्थ्यांना शिवरायांच्या प्रेरणादायी वारशाची जाणीव करून देणारा ठरला.

# जागृती मंचतर्फे युवकांसाठी मार्गदर्शन कार्यशाळा उत्साहात संपन्न




**महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड**

**MIT ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE, आळंदी येथील जागृती मंच यांच्या वतीने दि. २३ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १०.०० ते १२.०० या वेळेत महाविद्यालयाच्या सेमिनार हॉलमध्ये "आजचा युवक, सामाजिक अपेक्षा आणि सर्वांगीण विकास" या विषयावर आंतरमहाविद्यालयीन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. हा विशेष कार्यक्रम विद्यार्थी व पुरुष कर्मचारी यांच्यासाठी आयोजित करण्यात आला होता.**

या कार्यशाळेत प्रमुख मार्गदर्शक म्हणून श्री. रत्नाकर चंदाजकर सर उपस्थित होते. त्यांनी आजच्या युवकांवर असलेल्या सामाजिक अपेक्षा, करिअरचा ताण, कुटुंबीयांच्या अपेक्षा आणि स्वतःच्या आकांक्षांमधील संघर्ष यावर अतिशय साध्या व प्रभावी शब्दांत मार्गदर्शन केले. युवकांनी मानसिक, भावनिक व शारीरिक आरोग्याकडे लक्ष देणे, तसेच जीवनात संतुलन राखणे किती आवश्यक आहे, हे त्यांनी उदाहरणांसह स्पष्ट केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहयोगी अधिष्ठाता (विद्यार्थी कल्याण) डॉ. सुनील महाजन सर होते. त्यांनी अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक दृष्टिकोन, आत्मविश्वास आणि जबाबदार नागरिकत्व विकसित होते, असे मनोगत व्यक्त केले.

MAEER'S
MIT | Arts, Commerce & Science College
Affiliated to Savitribai Phule Pune University
Accredited by NAAC with "A" Grade

या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन जागृती मंचचे समन्वयक श्री. दिनकर राठोड सर व प्रा. दीक्षा कदम यांनी केले. तसेच जागृती मंचचे सदस्य प्रा. अनिता अटिवडकर, प्रा. ज्योती बच्छाव, प्रा. रश्मी पाठक आणि प्रा. कविता सांदभोर यांनी कार्यक्रमाच्या नियोजनात व अंमलबजावणीत मोलाचे सहकार्य केले.

याच वेळी विद्यार्थ्यांसाठी पोस्टर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. "सामाजिक दबाव आणि शैक्षणिक अपेक्षा", "आजच्या युवकांचे मानसिक आरोग्य", "करिअर आणि वैयक्तिक आयुष्याचा समतोल", "युवकांच्या विकासात कुटुंब व समाजाची भूमिका" तसेच "भावनिक बुद्धिमत्ता आणि स्व-देखभाल" या विषयांवर विद्यार्थ्यांनी आकर्षक व विचारप्रवर्तक पोस्टर सादर केली.

उत्कृष्ट पोस्टर सादर करणाऱ्या विद्यार्थ्यांना विशेष पाहुण्यांच्या हस्ते रोख पारितोषिके प्रदान करण्यात आली. तसेच सर्व सहभागी विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढला असून सामाजिक अपेक्षांशी सकारात्मक पद्धतीने सामना करण्याची दिशा मिळाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# नियमांचे उल्लंघन थांबवा, अन्यथा थेट कारवाई!

## ग्रॅप नियमांची कडक अंमलबजावणी; नियमभंगावर त्वरित दंडात्मक कारवाई

**महाईन्यूज** | पिंपरी-चिंचवड

**पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर यांच्या मार्गदर्शनानुसार शहरातील वाढत्या वायू प्रदूषणावर नियंत्रण आणण्यासाठी करण्यात येत असलेल्या उपाययोजनांचा सविस्तर आढावा घेण्यासाठी महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीतील दिवंगत माजी महापौर मधुकर पवळे सभागृहात अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. महापालिकेतील विविध विभागांनी समन्वयाने काम करून प्रदूषण नियंत्रणाची गती वाढवावी तसेच प्रदूषणाशी संबंधित नियमावलीची व्यापक जनजागृती करण्यात यावी, असे स्पष्ट निर्देश या बैठकीत अतिरिक्त आयुक्त सांडभोर यांनी दिले.**

महापालिका मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, आरोग्य कार्यकारी अधिकारी किरणकुमार मोरे, कार्यकारी अभियंता सोहन निकम, योगेश आल्हाट, सुर्यकांत मोहिते, उप अभियंता पंकज धेंडे, प्रीती गाडे, अशोक मोरे, संजय चव्हाण तसेच पर्यावरण विभाग, स्थापत्य विभाग, बांधकाम परवाना विभाग आणि आरोग्य विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

बैठकीत उपद्रव शोध पथकातील मनुष्यबळात वाढ करून शहरातील प्रत्येक बांधकाम प्रकल्प, रेडी मिक्स कॉंक्रिट प्लांट आणि औद्योगिक परिसरांना अधिकाधिक भेट द्यावी, असे निर्देश देण्यात आले. संबंधित ठिकाणी ग्रेडेड रिस्पॉन्स ॲक्शन प्लॅन (ग्रॅप) मधील नियमांचे पालन होते का, याची तपासणी करून नियमभंग करणाऱ्यांवर त्वरित दंडात्मक कारवाई तसेच कठोर प्रशासकीय उपाययोजना करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

शहरातील बांधकाम स्थळांवरून उडणारी धूळ आणि औद्योगिक क्षेत्रातील उत्सर्जनावर नियंत्रण ठेवण्यासाठी बांधकाम प्रकल्प आणि आरएमसी प्लांटवर एक्यूआय मॉनिटरिंग सिस्टीम बसविणे अनिवार्य आहे त्यानुसार त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यात यावी. जेणेकरून त्या परिसरातील प्रत्यक्ष वायू गुणवत्ता सतत मोजण्यास मदत होईल आणि नियमांचे पालन अधिक प्रभावीपणे सुनिश्चित करता येईल, हे यावेळी अधोरेखित करण्यात आले.

अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्यातर्फे महापालिकेच्या संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना प्रदूषण नियंत्रणाशी निगडित नियम, जबाबदाऱ्या आणि अंमलबजावणी प्रक्रियेबाबत विशेषतः संवेदनशील करण्यात आले. तसेच शहरातील सर्व नागरी आणि व्यावसायिक आस्थापना, बांधकाम, औद्योगिक क्षेत्र तसेच दैनंदिन कामकाजाशी संबंधित प्रत्येक घटकापर्यंत प्रदूषणासंदर्भातील नियमावलीची माहिती देण्याच्या अनुषंगाने जनजागृतीवर अधिकाधिक भर द्यावा असेही सांगितले.



> पिंपरी चिंचवड शहरातील बांधकाम व औद्योगिक आस्थापनांनी ग्रॅप अंतर्गत सर्व नियमांचे शंभर टक्के पालन करणे अत्यावश्यक आहे. धूळ नियंत्रण, उत्सर्जन व्यवस्थापन आणि स्वच्छतेसंदर्भातील कोणतीही ढिलाई स्वीकारली जाणार नाही. महापालिका प्रदूषण नियंत्रणाबाबत कठोर भूमिका घेत असून नियमभंग करणाऱ्यांवर त्वरित कारवाई केली जाईल. सर्व विभागांनी समन्वयाने व जलद गतीने कार्य करून शहराच्या वायू गुणवत्तेमध्ये अधिक सुधारणा घडवणे हे आमचे सर्वोच्च प्राधान्य आहे.
>
> – **तृप्ती सांडभोर,**
> **अतिरिक आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका.**

> बांधकाम प्रकल्प आणि आरएमसी प्लॅंटवर प्रदूषण नियंत्रणासाठीच्या उपाययोजना राबवाव्यात. उपद्रव शोध पथकांनी केलेली कारवाई आणि वसूल केलेला दंड हे शहरातील शिस्तबद्धता वाढविण्यासाठी महत्त्वाचे पाऊल ठरले आहे. पुढील काळात आम्ही तपासणी अधिक मजबूत करणार असून नियमांचे पालन सुनिश्चित करण्यासाठी सर्व संबंधित आस्थापनांकडून संपूर्ण सहकार्याची अपेक्षा आहे.
>
> – **संजय कुलकर्णी,**
> **मुख्य अभियंता, पिंपरी चिंचवड महापालिका.**

### शहरभर तपासणी व दंडात्मक कारवाई...

पिंपरी चिंचवड महापालिकेतर्फे प्रदूषण आणि स्वच्छतेसंदर्भातील नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर सातत्यपूर्ण आणि कठोर कारवाई करण्यासाठी दोन विशेष उपद्रव शोध पथकांची नेमणूक करण्यात आली आहे. फेब्रुवारी २०२५ ते फेब्रुवारी २०२६ या कालावधीत रस्त्यावर किंवा नदीकाठी कचरा टाकणे, सांडपाणी प्रक्रिया न करता नदीत सोडणे, कचरा जाळणे व प्लास्टिकचा गैरवापर, सार्वजनिक ठिकाणी घाण करणे, तसेच जैववैद्यकीय किंवा ई-कचऱ्याची अनियमित विल्हेवाट आणि बांधकाम राडारोडा टाकणे या विविध कारणांवरून महापालिकेने शहरभरातील एकूण ४ हजार ८५३ आस्थापनांवर कारवाई करण्यात आली असून २ कोटी ५९ लाख ६ हजार २०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.

# पिंपरी-चिंचवडमध्ये परराज्यातील नागरिकांसाठी 'वर्क परमिट' सक्तीचे करा

**महाईन्यूज** | पिंपरी-चिंचवड

**पिंपरी-चिंचवड महापालिका कार्यक्षेत्रात परराज्यातून येणाऱ्या नागरिक, कामगार, हॉटेल कामगार व व्यावसायिकांसाठी नोंदणीकृत 'वर्क परमिट' सक्तीचे करण्याची मागणी विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर यांनी आयुक्तांकडे केली आहे. याबाबतचे निवेदन त्यांनी आयुक्तांना सादर केले.**

निवेदनात म्हटले आहे की, पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्या झपाट्याने वाढत असून औद्योगिक शहर म्हणून विविध राज्यांतून मोठ्या प्रमाणात नागरिक रोजगार, व्यवसाय व कामानिमित्त येथे स्थायिक होत आहेत. पोलिस प्रशासनाच्या सूचनेनुसार भाडेकरूंची नोंदणी करणे बंधनकारक असले तरी प्रत्यक्षात १०० टक्के नोंदणी होत नसल्याची बाब गंभीर आहे. नोंदणी प्रक्रियेत त्रुटी असल्यामुळे शहराच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला असल्याचे भोईर यांनी नमूद केले आहे.




महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यांतून तसेच नेपाळ, जम्मू-काश्मीर, उत्तर प्रदेश, बिहार, मध्यप्रदेश, झारखंड, आसाम, पश्चिम बंगाल आदी भागांतून नागरिक मोठ्या संख्येने पिंपरी-चिंचवडमध्ये येत आहेत. औद्योगिक क्षेत्र, हॉटेल व्यवसाय, मजुरी व कौशल्याधारित कामांमध्ये त्यांचा सहभाग आहे. मात्र शहराच्या सुरक्षेच्या दृष्टीने अशा सर्व परराज्यातील कामगार व नागरिकांना वर्क परमिट सक्तीचे करावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

या प्रक्रियेमुळे अनधिकृत रेशनकार्ड, आधारकार्ड, मतदान ओळखपत्र काढण्याच्या प्रकारांना आळा बसेल तसेच पोलिस प्रशासनाला चरित्र पडताळणी करणे सोपे जाईल, असेही निवेदनात नमूद आहे. अलीकडे सांगवी परिसरात एका घरात बेकायदेशीररीत्या राहणारा नागरिक आढळून आल्याच्या घटनेचा उल्लेख करत भविष्यातील संभाव्य धोके टाळण्यासाठी तातडीने कठोर उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे.

पालिका व पोलिस प्रशासनाने समन्वय साधून परराज्यातून येणाऱ्या प्रत्येक नागरिकाची नोंदणी व वर्क परमिट प्रणाली राबवावी, तसेच संबंधित व्यवसायिक व मालकांनाही कामगारांची नोंदणी बंधनकारक करावी, अशी विनंती भाऊसाहेब भोईर यांनी केली आहे.


PRIYADARSHANI SCHOOL & JR COLLEGE
MOSHI
Balancing Sports and Academics for All-Round Development
ADMISSIONS OPEN
Grade Nursery to Grade XII
WHY CHOOSE PRIYADARSHANI SCHOOL?
43 Years of Excellence in Education | Advanced Robotics & Computer Labs
Experienced and Dedicated Faculty | Multiple Sports Grounds for All-Round Development
Proven 100% Results in Grade X | A Perfect Blend of Tradition and Innovation
+91 9890613333 | +91 9373073077
pgosm05@gmail.com
www.priyadarshanischoolmoshi.in